THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 3RD APRIL 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्तान सरकार.

### लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २१ फेब्रुआरी १८९० रोजीं मंजूर केला तो सर्वांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—

## सन १८९० चा आक्ट ३ रा.

### सन १८८४ चे आक्ट ६ व ७ हे सुधारण्याविषयीं आक्ट.

सन १८८४ चा देशांतील आगीच्या गलबतांविषयींचा आक्ट आणि सन १८८४ चा हिंदुस्तानी आगबोटींविषयींचा आक्ट हे पुढें सांगितल्याप्रमाणें सुधारणें ज्याअर्थीं योग्य आहे, त्याअर्थीं खालीं नमूद केल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

### सन १८८४ चा देशांतील आगीच्या गलबतांविषयींचा आक्ट.

१. सन १८८४ चा देशांतील आगीच्या गलबतांविषयींचा आक्ट याच्या पांचव्या कलमाच्या तिसऱ्या रकमेंत "देशांतील जलाशय" याच्या व्याख्येच्या ऐवजीं खालीं दिलेली व्याख्या दाखल करावी; ती व्याख्या येणेंप्रमाणें:— *(१८८४ च्या ६ व्या आक्टाच्या ५ व्या कलमांतील ३ ऱ्या रकमेची सुधारणा.)*

"(३) "देशांतील जलाशय" या शब्दांचा अर्थ ब्रिटिश इंडियांतील कोणताहि कालवा, नदी, सरोवर किंवा नाव्य जलाशय असा समजावा :"

२. सदर्हू आक्टाच्या ८ व्या कलमानंतर पुढील कलम दाखल करावें; तें कलम येणेंप्रमाणें:— *(८ व्या कलमानंतर एक नवें कलम दाखल करणें.)*

"८ अ. या आक्टाअन्वयें पाहाणी सुरू होण्यापूर्वीं, ज्या आगीच्या गलबताची पाहाणी व्हावयाची असेल त्याच्या मालकानें किंवा मास्तरानें, स्थानिक सरकार वेळोवेळीं सदर्हू कामाकरितां नेमील अशा अमलदारास— *(पाहाणीच्या संबंधाची फी.)*

(अ) या आक्टास जोडलेल्या दुसऱ्या परिशिष्टांतल्या अगर दुसऱ्या कोणत्याहि ठरविलेल्या दरांअन्वयें त्या आगीच्या गलबताच्या बारदानावर आकारलेली फी, व

(ब) कलकत्ता, मद्रास, मुंबई अथवा रंगून ह्यांखेरीज इतर कोणत्याहि पाहाणीच्या ठिकाणीं पाहाणी करावयाची असेल तर, सदर्हू ठिकाणीं सर्व्हेयरच्या जाण्याच्या संबंधानें कांहीं खर्च झाला असल्यास त्याबद्दल स्थानिक सरकार वेळोवेळीं सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा देऊन फर्मावील अशी दुसरी फी,

दिली पाहिजे."

१८८४ च्या ६ व्या आक्टांतील १० व्या कलमाच्या तिसऱ्या पोट-कलमाचा कांहीं भाग रद्द करणें.

३. सदर्हू आक्टाच्या १० व्या कलमाच्या तिसऱ्या पोट-कलमांतील "दाखल्याबद्दल द्यावयाच्या फीखेरीज" हे शब्द ह्या कलमावरून रद्द केले आहेत.

१८८४ च्या ६ व्या आक्टाच्या ११ व्या कलमाची सुधारणा व त्यांत जास्त मजकूर दाखल करणें.

४. (१) सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमाच्या १ ल्या पोट-कलमांतील ७ व ८ ओळींतील "फी व दुसऱ्या" हे शब्द ह्या कलमावरून रद्द केले आहेत.

(२) त्याच कलमांत खालीं दिलेलें पोट-कलम जास्त दाखल करावें; तें पोट-कलम येणेंप्रमाणें :—

" (४) स्थानिक सरकारास वेळोवेळीं,—

(अ) गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांची अगोदर मंजुरी घेऊन, पोट-कलम (१) अन्वयें पाहाणीचा दाखला देण्याचें त्याच पोट-कलमावरून आपणास सांगितलेलें काम कोणत्याहि इसमाकडे त्याच्या नांवानें किंवा हुद्याच्या नात्यानें सोंपविण्याचा अखत्यार आहे ;

(ब) आपल्याच अधिकारावर, पाहाणीचा दाखला हवालीं केला जाण्यास तयार असल्याबद्दल नोटीस देवविण्याचें पोट-कलम (३) यावरून आपणास सांगितलेलें काम कोणत्याहि इसमाकडे त्याच्या नांवानें किंवा हुद्याच्या नात्यानें सोंपविण्याचा अखत्यार आहे.

मात्र या पोट-कलमाच्या (अ) रकमेच्या संबंधानें असें ठरविलें आहे कीं, ज्या सर्व्हेयरनें कलम ९ अन्वयें पाहाणीचें ठरावपत्रक दिलें असेल त्या सर्व्हेयरास पाहाणीचा दाखला देण्याचा अधिकार पोंचेल असा त्या रकमेंत सांगितलेलें काम सोंपविण्याच्या हुकुमाचा अर्थ करूं नये."

१८८४ चा आक्ट ६ याचें १२ वें कलम रद्द करणें.

५. सदर्हू आक्टाचें १२ वें कलम ह्या कलमावरून रद्द केलें आहे.

१८८४ चा आक्ट ६ कलम १७, याची सुधारणा.

६. सदर्हू आक्टाच्या १७ व्या कलमांत "ज्या स्थानिक सरकारानें तो दाखला दिला" हे शब्द ज्या दोन ठिकाणीं आले आहेत त्या दोन्ही ठिकाणीं "ज्या स्थानिक सरकारानें" ह्या शब्दांपुढें "अगर ज्या स्थानिक सरकाराच्या प्रतिनिधीनें" हे शब्द दाखल करावे.

१८८४ च्या ६ व्या आक्टाच्या १९ व्या कलमाची सुधारणा.

७. सदर्हू आक्टाच्या १९ व्या कलमाच्या १ ल्या पोट-कलमांतील "त्या मालकानें किंवा मास्तरानें अर्जी केली असतां" ह्या शब्दांनंतर "पहिल्या पाहाणीच्या फीच्या दुपटीहून अधिक नाहीं अशी स्थानिक सरकार फर्मावील ती फी त्यानें दिली असतां" हे शब्द दाखल करावे.

८. सदर्हू आक्टाच्या २१ व्या कलमाच्या २ ऱ्या पोट-कलमांतील (ड) रकमेंत "पाहाणीच्या दाखल्याबद्दल" या शब्दांच्याऐवजीं "पाहाणीच्या संबंधानें" हे शब्द दाखल करावे. १८८४ च्या ६ व्या आक्टाच्या २१ व्या कलमाची सुधारणा.

९. सदर्हू आक्टाच्या २५ व्या कलमानंतर खालीं लिहिलेलें कलम दाखल करावें; तें कलम येणेंप्रमाणें:— १८८४ च्या ६ व्या आक्टाच्या २५ व्या कलमानंतर नवें कलम दाखल करणें.

काम केल्याचा दाखला देणें.

"२५ अ. (१) स्थानिक सरकारास त्यांचे विचारास आल्यास, ज्या मनुष्यानें १८९० च्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारिखेच्या पूर्वी देशांतील एकाद्या आगीच्या गलबतावर मास्तर, इंजिनियर किंवा इंजिन-ड्रायवर यांचे काम केलें असेल अशा कोणत्याहि इसमास परीक्षा घेतल्याशिवाय, प्रसंगाप्रमाणें, देशांतील आगीच्या गलबतावर पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गाच्या मास्तराचें, इंजिनीयरचें किंवा इंजिन-ड्रायवराचें काम करण्यास परवानगी आहे अशा अर्थाचा नोकरीबद्दलचा दाखला देण्याचा अधिकार आहे.

(२) अशा रीतीनें दिलेल्या नोकरीच्या दाखल्याचा, व ह्या आक्टाअन्वयें परीक्षा घेऊन दिलेल्या लायकीच्या दाखल्याचा एकसारखाच उपयोग होईल."

१०. सदर्हू आक्टाच्या २६व्या कलमांतील "लायकीच्या" ह्या शब्दानंतर "अथवा नोकरीच्या" हे शब्द दाखल करावे. १८८४ च्या ६ व्या आक्टाच्या २६व्या कलमाची सुधारणी.

११. सदर्हू आक्टाच्या २९व्या कलमांत खालीं दिलेला अधिक मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:— १८८४ च्या ६ व्या आक्टाच्या २९ व्या कलमांत अधिक मजकूर दाखल करणें.

"तसेंच, ह्या आक्टाअन्वयें स्थानिक सरकार नोकरीचे दाखले देण्याच्या संबंधानेंहि कानू करण्यास मुखत्यार आहे; आणि अशा कानूवरून त्यास.—

(अ) सदर्हू दाखल्यांबद्दल देण्याच्या फीची रकम ठरविण्याचा, आणि

(ब) सदर्हू दाखले कोणत्या नमुन्याबरहुकुम लिहिलेले असावे व स्थानिक सरकारानें ठेवण्याची त्या दाखल्यांची नकल कोणत्या रीतीनें दप्तरीं ठेवावी हें ठरविण्याचा,

अधिकार आहे."

१२. सदर्हू आक्टच्या ७ व्या बाबींत खालीं दिलेला अधिक मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:— १८८४ च्या ६ व्या आक्टाच्या ७ व्या बाबींत अधिक मजकूर दाखल करणें.

उतारूंच्या सरक्षणाकरितां कानू करण्याचा स्थानिक सरकारास अधिकार.

"५१ अ. (१) देशांतील आगीच्या गलबतांवरील उतारूंच्या संरक्षणाबद्दलहि कानू करण्याचा स्थानिक सरकारास अधिकार आहे, व अशा कानूवरून, उतारूंच्या उपयोगासाठीं पुरे इतके गोडें पाणी फुकट देण्याकरितां अशा गलबतांवर ठेविलें पाहिजे, उतारूंच्या तिकिटांच्या किंमती त्यांवर छापून अगर दुसऱ्या कोणत्याहि तऱ्हेनें दर्शविल्या पाहिजेत वगैरे ठरविण्याचा अधिकार स्थानिक सरकारास आहे.

(२) ह्या कलमाअन्वयें केलेल्या कोणत्याहि कानूंत असा ठराव दाखल करतां येईल कीं कोणताहि गलबताचा मालक, मास्तर अथवा त्यातील उतारू अशा कानूचें उलंघन करील तर त्यास ५० रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा दिली जाईल."

१३. सदरील आक्टाच्या ५४ व्या कलमानंतर खालीं दिलेलें कलम दाखल करावें; तें कलम येणेंप्रमाणें:— १८८४ चा आक्ट ६, कलम ५४ यानंतर नवीन कलम दाखल करणें.

तारवावर जास्त उतारू असल्याबद्दल शिक्षा.

"५४ अ. देशांतील आगीच्या कोणत्याहि गलबतांतून अगर त्याच्या कोणत्याहि भागांतून अगर भागावरून उतारूंची जी संख्या सर्व्हेयरच्या मताप्रमाणें नेणें योग्य आहे असें पाहणीच्या दाखल्यांत लिहिलें असेल, त्या संख्येपेक्षां जास्त उतारू त्या

गलबतावर अगर त्याच्या कोणत्याहि भागावर अगर भागांत नेले असतां, त्या संख्येपेक्षां जास्त असलेल्या प्रत्येक उतारूबद्दल मालक व मास्तर यांपैकीं प्रत्येक दहा रुपयांपर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र होतो."

१८८४ च्या ६ व्या आक्टाच्या दुसऱ्या परिशिष्टाच्या रुदराची सुधारणा.

१४. सदहू आक्टाच्या दुसऱ्या परिशिष्टांत "१२ वें कलम पहा" हे शब्द व अंक यांच्या ऐवजीं "८अ कलम पहा" हा अंक, अक्षर व शब्द दाखल करावे.

## सन १८८४ चा हिंदुस्तानी आगबोटींविषयींचा आक्ट.

१८८४ च्या ७ व्या आक्टाच्या १० व्या कलमानंतर नवें कलम दाखल करणें.

१५. सदहू आक्टाच्या १० व्या कलमानंतर पुढील कलम दाखल करावें; तें कलम येणेंप्रमाणें:--

पाहाणीबद्दल फी.

"१०अ. या आक्टाअन्वयें पाहाणी सुरू होण्यापूर्वीं, ज्या आगबोटीचीं पाहाणी व्हावयाची असेल तिच्या मालकानें किंवा मास्तरानें, स्थानिक सरकार वेळोवेळीं सदहू कामाकरितां नेमील अशा अमलदारास--

(अ) या आक्टास जोडलेल्या परिशिष्टांतल्या अगर दुसऱ्या कोणत्याहि ठरविलेल्या दरांअन्वयें त्या आगबोटीच्या बारदानावर आकारलेली फी, व

(ब) कलकत्ता, मद्रास, मुंबई अथवा रंगून ह्यांखेरीज इतर कोणत्याहि पाहाणीच्या बंदरांत पाहाणी करावयाची असेल तर, सदहू बंदरीं सर्व्हेयरच्या जाण्याच्या संबंधानें कांहीं खर्च झाला असल्यास त्याबद्दल स्थानिक सरकार वेळोवेळीं सरकारी ग्याझेटांत जाहीरनामा देऊन फर्मावील अशी दुसरी फी,

दिली पाहिजे."

१८८४ च्या ७ व्या आक्टाच्या १२ व्या कलमांतील तिसऱ्या पोट-कलमाचा कांहीं भाग रद्द करणें.

१६. सदहू आक्टाच्या १२ व्या कलमाच्या ३ ऱ्या पोट-कलमांतील "दाखल्याबद्दल द्यावयाच्या फीशिवाय" हे शब्द या कलमावरून रद्द केले आहेत.

१८८४ च्या ७ व्या आक्टाच्या १३ व्या कलमाची सुधारणा व त्यांत अधिक मजकूर दाखल करणें.

१७. (१) सदहू आक्टाच्या १३ व्या कलमाच्या १ ल्या पोट-कलमांतील "फी व दुसऱ्या" हे शब्द या कलमावरून रद्द केले आहेत.

(२) त्याच कलमांत खालीं दिलेलें पोट-कलम जास्त दाखल करावें; तें पोट-कलम येणेंप्रमाणें:--

"(४) स्थानिक सरकारास वेळोवेळीं--

(अ) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची अगोदर मंजुरी घेऊन, पोट-कलम (१) अन्वयें पाहाणीचा दाखला देण्याचें त्याच पोट-कलमावरून आपणास सांगितलेलें काम कोणत्याहि इसमाकडे त्याच्या नांवानें किंवा हुद्याच्या नात्यानें सोंपविण्याचा अखत्यार आहे;

(ब) आपल्याच अधिकारावर, पाहाणीचा दाखला हवालीं केला जाण्यास तयार असल्याबद्दल नोटीस देवविण्याचें पोट-कलम (३) यावरून आपणास सांगितलेलें काम कोणत्याहि इसमाकडे त्याच्या नांवानें किंवा हुद्याच्या नात्यानें सोंपविण्याचा अखत्यार आहे:

मात्र या पोट-कलमाच्या (अ) रकमेच्या संबंधानें असें ठरविलें आहे कीं, ज्या सर्व्हेयरनें कलम ११ अन्वयें पाहाणीचें ठरावपत्रक दिलें असेल त्या सर्व्हेयरास पहा-

णीचा दाखला देण्याचा अधिकार पोंचेल असा त्या रकमेंत सांगितलेलें काम सोंपविण्याच्या हुकुमाचा अर्थ करूं नये."

१८. सदरील आक्टाचें १४ वें कलम या कलमावरून रद्द केलें आहे. — *१८८४ चा आक्ट ७ याचें १४ वें कलम रद्द करणें.*

१९. सदरील आक्टाच्या १९ व्या कलमांत "ज्या स्थानिक सरकारानें तो दाखला दिला" हे शब्द ज्या दोन ठिकाणीं आले आहेत त्या दोन्हीं ठिकाणीं "ज्या स्थानिक सरकारानें" ह्या शब्दांपुढें "अगर ज्या स्थानिक सरकाराच्या प्रतिनिधीनें" हे शब्द दाखल करावे. — *१८८४ चा आक्ट ७, कलम १९ याची सुधारणा.*

२०. सदर्हू आक्टाच्या २१व्या कलमाच्या १ ल्या पोट-कलमांत "त्या मालकानें किंवा मास्तरानें अर्जी केली असतां" ह्या शब्दांनंतर "आणि पहिल्या पाहाणीच्या फीच्या दुपटीहून अधिक नाहीं अशी स्थानिक सरकार फर्मावील ती फी त्यानें दिली असतां" हे शब्द अधिक दाखल करावे. — *१८८४ च्या ७व्या आक्टाच्या २१ व्या कलमाची सुधारणा.*

२१. सदर्हू आक्टाच्या २४ व्या कलमाच्या दुसऱ्या पोट-कलमांतील (ड) रकमेंत "पाहाणीच्या दाखल्यांबद्दल" ह्या शब्दांऐवजीं "पाहाणीच्या संबंधानें" हे शब्द दाखल करावे. — *१८८४ च्या ७ व्या आक्टाच्या २४ व्या कलमाची सुधारणा.*

२२. सदर्हू आक्टाच्या परिशिष्टांत "१४वें कलम पहा" हे अंक व शब्द यांच्या ऐवजीं "१०अ कलम पहा" हे अंक, अक्षर व शब्द दाखल करावे. — *१८८४ च्या ७ व्या आक्टाच्या परिशिष्टाच्या सदराची सुधारणा.*

(True Translation.)

Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.